सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

## जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

# शारदीय नवरात्र महोत्सव

## २०१७ पुर्वनियोजन बैठक

सुस्वागतम्



# श्री. क्षेत्र तुळजापूर

# विश्वस्त समिती,
# श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. रा. वि. गमे | जिल्हाधिकारी उस्मानाबाद तथा अध्यक्ष<br>श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर |
| २ | मा. आ. श्री. मधुकररावजी चव्हाण | मा. आमदार तथा विश्वस्त सदस्य,<br>श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर |
| ३ | श्री. चेतन गिरासे | उप विभागीय अधिकारी, (म.) उस्मानाबाद तथा विश्वस्त सदस्य, श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर |
| ४ | श्री. पंडित जगदाळे | प्र.नगराध्यक्ष, तुळजापूर तथा विश्वस्त सदस्य,<br>श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर |
| ५ | श्री. दिनेश झांपले | तहसीलदार तुळजापूर तथा विश्वस्त सदस्य,<br>श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर |

नवरात्र कालावधीत सर्व विभागांशी समन्वय ठेऊन मंदिरातील सर्व धार्मिक कार्यक्रम पार पाडण्यासाठी सहभाग नोंदविणे.

# यात्रा व्यवस्थापक

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजाभवानी मंदिर संस्थान

मा. पोलीस अधिक्षक, उस्मानाबाद

जिल्हाधिकारी कार्यालय, नियंत्रण कक्ष

- मंदिर संस्थान
- तहसिलदार, तुळजापूर
- आरोग्य विभाग
- पुरवठा विभाग
- नगर परिषद, तुळजापूर

- एम.एस.ई.बी.
- बांधकाम विभाग
- उप प्रा. परिवहन
- माहिती कार्यालय
- परिवहन

- अन्न व औषध
- गटविकास अधिकारी
- राज्य उत्पादन शुल्क
- राष्ट्रीय महामार्ग
- दूरसंचार

# शारदीय नवरात्र महोत्सव २०१७

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव |
|---|---|
| ०१ | सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, उस्मानाबाद |
| ०२ | उपनियंत्रक वजन व मापे विभाग, उस्मानाबाद |
| ०३ | जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद |
| ०४ | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उस्मानाबाद |
| ०५ | विभाग नियंत्रक, एस.टी. महामंडळ,उस्मानबाद |
| ०६ | जिल्हा शल्य चिकीत्सक, उस्मानाबाद |
| ०७ | जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.उस्मानाबाद |
| ०८ | जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, उस्मानाबाद |

# शारदीय नवरात्र महोत्सव २०१७

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव |
|---|---|
| ०९ | अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद |
| १० | अधिक्षक अभियंता, म. रा. वि. वि. कंपनी, उस्मानाबाद |
| ११ | कार्यकारी अभियंता कृष्णा मराठवाडा बां. वि. क्रं.१, उ,बाद |
| १२ | जिल्हा कामगार अधिकारी, उस्मानाबाद |
| १३ | जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद |
| १४ | जिल्हा प्रबंधक दूरसंचार विभाग, उस्मानाबाद |
| १५ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जि.प.उस्मानाबाद |
| १६ | गट विकास आधिकारी तुळजापूर |

# शारदीय नवरात्र महोत्सव २०१७

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव |
|---|---|
| १७ | उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद |
| १८ | तहसीलदार तुळजापूर |
| १९ | प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण सोलापूर |
| २० | प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग, नांदेड |
| २१ | कार्यकारी अभियंता, सा. बां. वि., उस्मानाबाद |
| २२ | मंदिर व्यवस्थापक, तुळजापूर |
| २३ | मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर |
| २४ | पोलीस अधिक्षक, उस्मानाबाद |

# भक्तांसाठी केलेले नियोजन

- बाहेरगावाहून येणा-या भक्तांसाठी उत्तम व सुरक्षित पार्किंग सुविधा

- दर्शन मार्ग सुलभ होण्यासाठी भक्तासांठी मार्गदर्शक सुचना देणारे बोर्ड

- भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची/ काही काळ विश्रांतीसाठी निवारा व्यवस्था/ इतर सुविधा (स्वच्छतेसाठी) देण्यात आली आहे.

- भक्तासांठी उत्तम आरोग्य सुविधा तसेच सुरक्षा यंत्रणा उभारण्यात आली आहे.

# शारदीय नवरात्र महोत्सव २०१७

| | | |
|---|---|---|
| बुधवार | १३/०९/२०१७ | सायंकाळी श्रीदेविजींची मंचकी निद्रा. |
| गुरूवार | २१/०९/२०१७ | पहाटे श्रीदेविजींची सिंहासनावर प्रतिष्ठापना, दुपारी १२ वाजता. **घटस्थापना** ब्राम्हणांस अनुष्ठानाची वर्णी देणे व रात्रौ छबीना. |
| शुक्रवार | २२/०९/२०१७ | श्रीदेविजींची नित्योपचार पुजा व रात्रौ छबीना. |
| शनिवार | २३/०९/२०१७ | श्रीदेविजींची नित्योपचार पुजा व रात्रौ छबीना. |
| रविवार | २४/०९/२०१७ | **ललिता पंचमी** श्रीदेविजींची नित्योपचार पुजा **रथ अलंकार महापुजा** व रात्रौ छबीना. |
| सोमवार | २५/०९/२०१७ | श्रीदेविजींची नित्योपचार पुजा **मुरली अलंकार महापुजा** व रात्रौ छबीना. |
| मंगळवार | २६/०९/२०१७ | श्रीदेविजींची नित्योपचार पुजा **शेषशाही अलंकार महापुजा** व रात्रौ छबीना. |
| बुधवार | २७/०९/२०१७ | श्रीदेविजींची नित्योपचार पुजा **भवानी तलवार अलंकार महापुजा** व रात्रौ छबीना. |
| गुरूवार | २८/०९/२०१७ | **दुर्गाष्टमी** श्रीदेविजींची नित्योपचार महापुजा **महिषासुर मर्दिनी अलंकार महापुजा,** दुपारी ४.३० वाजता वैदिक होमास व हवनास आरंभ, रात्रौ ९.४० वाजता **पुर्णाहुती** व रात्रौ छबीना. |
| शुक्रवार | २९/०९/२०१७ | **महानवमी** श्रीदेविजींची नित्योपचार पुजा दुपारी १२.०० वाजता होमावर धार्मिक विधी, घटोत्थापन, व रात्रौ नगरहून येणारे **पलंग पालखीची** मिरवणूक. |
| शनिवार | ३०/०९/२०१७ | **विजयादशमी (दसरा)** उषःकाली श्रीदेविजींची शिबीकारोहण, सिमोल्लंघन मंदिराभोवती मिरवणूक व मंचकी निद्रा. शमीपुजन व सार्वत्रिक सिमोल्लंघन |
| गुरूवार | ०५/१०/२०१७ | पहाटे म्हणजे (दि.०४/१०/२०१७ चे उत्तर रात्रौ) **श्री भवानी मातेची सिंहासनावर प्रतिष्ठापना कोजागिरी व मंदिर पौर्णिमा** व रात्रौ सोलापूरच्या **काठ्यासह छबीना.** |
| शुक्रवार | ०६/१०/२०१७ | श्रीदेविजींची नित्योपचार पुजा, अन्नदान महाप्रसाद व रात्रौ सोलापूरच्या **काठ्यासह छबीना.** |




# आपत्ती व्यवस्थापन नियोजन

## तुळजाभवानी मंदिरातील संभाव्य धोक्याची ठिकाणे

# १. बीडकर पायरी पायथा

संभाव्य धोके – या ठिकाणी चेंगरा-चेंगरी झाल्यास मोठया प्रमाणात जिवीत हानी होऊ शकते.

पूर्व तयारी – या ठिकाणी प्रामुख्याने गर्दीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे

आवश्यक साहित्य व उपलब्धता – काही अनुचित प्रकार घडल्यास सुचना देण्यासाठी यंत्रणा आवश्यक, प्रथमोपचार साहित्य, स्ट्रेचर, सुरक्षित मार्गाचे नियोजन आवश्यक आहे.

सबंधित यंत्रणा – पोलीस होमगार्ड, मंदीर सुरक्षारक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक.

## २. पाटील वाडयाच्या मागील बाजूस धर्मदर्शन रांग, कच-याचा ढिग

**पूर्व तयारी** – या ठिकाणचा शक्य असेल तेवढा मातीचा ढिगारा उपसा करणे गरजेचे आहे.

**आवश्यक साहित्य व उपलब्धता** – काही अनुचित प्रकार घडल्यास सुचना देण्यासाठी यंत्रणा आवश्यक, प्रथमोपचार साहित्य, स्ट्रेचर, सुरक्षित मार्गाचे नियोजन, बारीक जाळी ठोकुन मजबुत पत्रा ठोकणे आवश्यक आहे.

**संबंधित यंत्रणा** – पोलीस होमगार्ड, मंदीर सुरक्षारक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक व नगर परिषद

# ३. दर्शनासाठी वापरण्यात येणारे टनेल तसेच दर्शन मंडप

पूर्व तयारी – या ठिकाणी फॅनची सुविधा, पाणी व ओ.आर.एस. पूरवठा करणे आवश्यक आहे.

आवश्यक साहित्य व उपलब्धता – काही अनुचित प्रकार घडल्यास सुचना देण्यासाठी यंत्रणा आवश्यक, प्रथमोपचार साहित्य, स्ट्रेचर, सुरक्षित मार्गाचे नियोजन आवश्यक असून सदरील ठिकाणी गर्दीच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

संबंधित यंत्रणा – पोलीस होमगार्ड, मंदीर सुरक्षारक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक व मंदीर व्यवस्थापक.

# ४. झुलता पुल — टोळ भैरव मंदीर टप्पा

पूर्व तयारी – मंदीर परिसराबाहेरील गर्दीचा अंदाज घेऊन दर्शनासाठी वापरण्यात येणा–या टनेल ठिकाणची गर्दी नियंत्रित करणे.

आवश्यक साहित्य व उपलब्धता – काही अनुचित प्रकार घडल्यास सुचना देण्यासाठी यंत्रणा आवश्यक, प्रथमोपचार साहित्य, स्ट्रेचर, सुरक्षित मार्गाचे नियोजन आवश्यक असून सदरील ठिकाणी गर्दीच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

संबंधित यंत्रणा – पोलीस होमगार्ड, मंदीर सुरक्षारक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक व मंदीर व्यवस्थापक.

# ५. शिवाजी दरवाजा

पूर्व तयारी – या ठिकाणचे नक्षीकाम केलेले दगड अर्धवट निखळलेले आहेत त्यामुळे पुरातत्व विभागाच्या सुचनेनुसार तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे.

आवश्यक साहित्य व उपलब्धता – यात्रेच्या कालावधीत दगड पडल्यास गोंधळ होऊ शकतो, त्यामुळे सुचना देण्यासाठी यंत्रणा आवश्यक, प्रथमोपचार साहित्य, स्ट्रेचर, सुरक्षित मार्गाचे नियोजन आवश्यक आहे. याठिकाणी वहिवाट किंवा गर्दी होणार नाही याची दक्षता मंदीर समितीने घेणे आवश्यक आहे.

संबंधित यंत्रणा – पोलीस होमगार्ड, मंदीर सुरक्षारक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, मंदीर व्यवस्थापक व पुरातत्व विभाग.

# ६. नागझरी कुंड

पूर्व तयारी - या ठिकाणी वायर गुंडाळलेल्या असल्याने शॉर्ट सर्किटची शक्यता आहे, अनुचित प्रकार घडल्यास जिवीत हानी होऊ शकते त्यामुळे वायरींग सुरक्षित करणे, लोखंडी पुलाचा गंज काढुन चांगल्या प्रकारचा रंग देणे आणि बाहेर जाण्यासाठीच्या मार्गाचा अडथळा दूर करणे गरजेचे आहे.

आवश्यक साहित्य व उपलब्धता — सतत विद्युत विभागाचे पथक अत्याधुनिक सामग्रीसह कार्यरत ठेवणे आवश्यक आहे.

संबंधित यंत्रणा - पोलीस होमगार्ड, मंदीर सुरक्षारक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक व विद्युत विभाग.

## ७. प्रशासकीय इमारतीच्या मागील बाजुची दगडी भिंत

पूर्व तयारी – या ठिकाणीचा शक्य असेल तितका मातीचा ढिगारा उपसणे आवश्यक आहे. तसेच पुढील काळात सदरचा मार्ग मोठा करणे गरजेचे आहे.

आवश्यक साहित्य व उपलब्धता – सुचना देण्यासाठी यंत्रणा आवश्यक, प्रथमोपचार साहित्य, स्ट्रेचर, सुरक्षित मार्गाचे नियोजन, बारीक जाळी ठोकुन मजबुत पत्रा ठोकणे आवश्यक आहे.

संबंधित यंत्रणा – पोलीस होमगार्ड, मंदीर सुरक्षारक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक व नगर परिषद.

# ८. शहाजी द्वार – मंदीराचे मुख्य प्रवेशद्वार

पूर्व तयारी – या ठिकाणी प्रामुख्याने गर्दीवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे, पाणी पडून परिसर निसर्डा होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच नारळ फोडण्याची प्रथा नाही याबाबत मोठया प्रमाणावर सुचना फलक लावणे आवश्यक आहे.

आवश्यक साहित्य व उपलब्धता – सुचना देण्यासाठी यंत्रणा आवश्यक, प्रथमोपचार साहित्य, स्ट्रेचर, वैद्यकीय साहित्यासह पथक आवश्यक आहे.

संबंधित यंत्रणा – पोलीस होमगार्ड, मंदीर सुरक्षारक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक.

## ९. श्री. कल्लोळ तिर्थ, गोमुख तिर्थ, पाय-या व परिसर

पूर्व तयारी - या ठिकाणी प्रामुख्याने गर्दीवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे, पाणी पडून परिसर निसर्डा होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. नवरात्र कालावधीत हे ठिकाण वापरासाठी बंद असते तरी इतर वेळी या ठिकाणी नियोजन करणे आवश्यक आहे.

आवश्यक साहित्य व उपलब्धता - सुचना देण्यासाठी यंत्रणा आवश्यक, प्रथमोपचार साहित्य, स्ट्रेचर, वैद्यकीय साहित्यासह पथक आवश्यक आहे.

संबंधित यंत्रणा - पोलीस होमगार्ड, मंदीर सुरक्षारक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक.

# १०. श्री. निंबाळकर द्वार

**पूर्व तयारी** – या ठिकाणी प्रामुख्याने गर्दीवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे, तसेच या ठिकाणी चेंगराचेंगरीची होण्याची शक्यता असल्याने दक्षता घेणे आवश्यक आहे.

**आवश्यक साहित्य व उपलब्धता** – सुचना देण्यासाठी यंत्रणा आवश्यक, प्रथमोपचार साहित्य, स्ट्रेचर, वैद्यकीय साहित्यासह पथक आवश्यक आहे.

**संबंधित यंत्रणा** – पोलीस होमगार्ड, मंदीर सुरक्षारक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक.

# ११. बाहेर पडण्यासाठीच्या स्टेडीयम पाय-या

पूर्व तयारी - या ठिकाणी प्रामुख्याने गर्दीवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे, तसेच या ठिकाणी चेंगराचेंगरीची होण्याची शक्यता असल्याने दक्षता घेणे आवश्यक आहे.

आवश्यक साहित्य व उपलब्धता - सुचना देण्यासाठी यंत्रणा आवश्यक, प्रथमोपचार साहित्य, स्ट्रेचर, वैद्यकीय साहित्यासह पथक आवश्यक आहे.

संबंधित यंत्रणा - पोलीस होमगार्ड, मंदीर सुरक्षारक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक.

# १२. दर्शनासाठी वापरण्यात येणारे टनेल

पूर्व तयारी – या ठिकाणी गर्दीमुळे आतील लोकांना श्वसनाचा त्रास होऊ शकतो त्यामुळे प्रामुख्याने गर्दीवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. तसेच पाणी पडून परिसर निसर्डा होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

आवश्यक साहित्य व उपलब्धता – सुचना देण्यासाठी यंत्रणा आवश्यक, प्रथमोपचार साहित्य, स्ट्रेचर, वैद्यकीय साहित्यासह पथक आवश्यक आहे. तसेच फॅनची उपलब्धता असावी.

संबंधित यंत्रणा – पोलीस होमगार्ड, मंदीर सुरक्षारक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक.

# १३. यात्रा परिसर

- महाद्वार व परिसर - नवरात्रीचा पहिला दिवशी (घटस्थापना) मशाल घेऊन येणारे लोक.
- दिपक चौक — या ठिकाणी मंदिराकडे जाण्यासाठी एकत्रीत आलेले भाविक.
- पार्किंग, घाटशिळ रोड, पाय–या.
- बिडकर तलाव- या ठिकाणी अंघोळीसाठी येणारे भाविक.
- टोळभैरव मंदिरासमोरील भाग.

# सुचनांचे फलक प्रसिध्द करावयाची ठिकाणे

- दिपक चौक.
- शिवाजी चौक.
- सावरकर चौक.
- एस.टी. स्टॅन्ड- नवीन व जुने.
- पार्किंचे ठिकाण- उस्मानाबाद रोड, लातूर रोड, घाटशिळ.

# पथके व आवश्यक साहित्य

- अग्निशमन दल.
- दंगल विरोधी पथक.
- श्वान व घातपात विरोधी पथक
- अन्न व औषधी नियंत्रण पथक
- दारु बंदी नियंत्रण पथक
- १०८ रुग्णवाहीका
- पोहणारे पोलीस-होमगार्ड पथक
- स्वच्छता पथक, छेडछाड विरोधी पथक

# महत्वाच्या सुचना

**एम.एस.ई.बी.-** झुलता पुल या ठिकाणच्या दर्शन रांगेच्या नियोजनानुसार मोठया प्रमाणावर विद्युत वाहक यंत्रणा तसेच विद्युत खांब व विद्युत वायरी मोठया प्रमाणावर दर्शनाच्या रांगेमध्ये आहेत. भविष्यात कोणत्याही प्रकारची दूर्घटना घडू शकते त्यासाठी या मार्गातील सर्व विद्युत वाहक यंत्रणा (मोठे खांब/डीपी) या ठिकाणाहून कायम स्वरुपी काढणे आवश्यक आहे. या बाबत एम.एस.ई.बी. ने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**मंदिर व्यवस्थापन –** अभिषेक रांग, शिवाजी दरवाज्याच्या पुढील बाजूस संभाजी प्रांगण पहिल्या टप्प्यातील पाठीमागील बाजूस पहाटेच्या वेळी लोक अभिषेकासाठी रांगेत उभे राहतात. क्षणाच्या झोपेमध्ये लोक वरुन पडण्याच्या घटना घडल्या आहेत तेव्हा या ठिकाणी बॅरीकेटिंग करणे आवश्यक आहे.

# मंदिर व्यवस्थापन

बीडकर पायरी प्रवेशमार्ग - गेट आवश्यक.

बीडकर पायरीपासून धर्मदर्शनाकडे जातानाचा प्रवेशमार्ग— गेट आवश्यक.

धर्मदर्शन ४ था मजला प्रवेशमार्गाच्या बाजुला रस्ता असावा. (श्री. टोळे यांच्या घराजवळ) सदरील ठिकाण पूर्ण बंद करण्यात येऊ नये, कायमस्वरुपी बॅरीकेटिंग नसावे.

बीडकर पायरी पायथा ते दर्शनमंडप चौथा मजला मधील मार्ग एक दर्शन रांग असावी.

# मंदिर व्यवस्थापन

तळ मजला आपत्कालीन गेट बसवावे.

प्रत्येक संभाव्य आपत्तीग्रस्त ठिकाणी सुरक्षीत मार्ग ठेवणे आवश्यक व त्याची माहिती सर्व बंदोबस्त करणा-यांना असावी.

घटस्थापनेच्या आधी बंदोबस्तासाठी आलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना मंदिर व यात्रा परिसराचा परीचय करुन देणे आवश्यक आहे.

# स्पिकर/माईकद्वारे द्यावयाच्या सुचना

- गर्दीमध्ये पळापळ करु नका.
- अफवांवर विश्वास ठेवू नका.
- यात्रेत चुकामूक झाल्यास जवळील पोलीस यंत्रणेस संपर्क साधावा.
- आपले दागिने पैसे, मौल्यवान वस्तु, मोबाईल सांभाळा.
- बेवारस पडलेल्या कोणत्याही वस्तूस हात लावु नका.
- आपल्या कुटुंबासोबत रहा, लहान मुलांचा हात सोडू नका, अनोळखी व्यक्तीबरोबर इतरत्र जावू नका.

# स्पिकर/माईकद्वारे द्यावयाच्या सुचना

- सुचना फलकांकडे लक्ष द्या.
- आपली वाहने पार्किंगच्या ठिकाणावरच लावा.
- मंदिरापर्यंत जाण्यासाठी अल्प दरात रिक्षाची सोय करण्यात आली आहे या सेवेचा लाभ घ्या.
- प्रवासासाठी एस. टी. महामंडळाच्या वतीने बसेसची सोय करण्यात आलेली आहे त्यानेच प्रवास करा.
- दर्शनासाठी सुरक्षित मार्गाचा अवलंब करा.
- एखादी वस्तु मोफत वाटप होत असेल तर त्या ठिकाणी गर्दी करु नका आपला जीव धोक्यात घालू नका.

# स्पिकर/माईकद्वारे द्यावयाच्या सुचना

- कोणत्याही अनोळखी व्यक्तीने काही खाण्यासाठी पदार्थ दिल्यास खाऊ नका.
- अस्वस्थ वाटल्यास, काही त्रास होत असल्यास जवळील प्रथमोपचार केंद्राशी संपर्क साधावा.
- आपले साहित्य सुरक्षित ठेवण्यासाठी लॉकरचा उपयोग करा.
- अनोळखी/अनाथ/चुकलेली मुले आढळल्यास नजीकच्या पोलीस चौकी/स्टेशनशी संपर्क साधावा.




आभारी आहोत . . .